दूरध्वनी : 2533 1990

ठाणे महानगरपालिका, ठाणे.

महानगरपालिका भवन, डॉ. अल्मेडा रोड, पाचपाखाडी, ठाणे-400 602

THE MUNCIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

संदर्भ क्र. / ठा.म.पा./ वृक्षा/वृउ/ -७५३९ दिनांक: 22/02/2016

प्रति,

मे स्केप्स
गुप्ते कॉटेज, भक्ती मंदिर समोर
पाचपारवाडा ठाणे (प)

THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

विषय : वृक्षांचे पुनर्रोपण / वृक्षतोडण्याच्या परवानगीबाबत.

संदर्भ : १. आवक क्र. 3823 दि. 29/6/15 रोजीचा अर्ज.

२. **मा. वृक्षप्राधिकरण ठराव क्र.** 68 दि२८.१२.२०१५ अन्वये प्राप्त मान्यता.

ज्याअर्थी, प्रकरणी महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम, १९७५ नुसार उपरोक्त विषयाबाबत प्राप्त अर्जातील विकास प्रस्ताव क्र. ८८/१४२ ठिकाण मौजे/कि/ठाणे/ सर्व्हे नं.२३,४,६१/२/१,२,३ सेक्टर ३ वि मानपाडा ठाणे (प.) येथील नियोजित विकास आराखड्यामध्ये अस्तित्वात असलेल्या वृक्षांपैकी बांधकामात बाधित होणारे 33 वृक्ष पुर्नरोपण करणे व 86 वृक्ष तोडणे बाबत संदर्भ क्र.१ अन्वये अर्जासह आवश्यक कागदपत्रे व नकाशे प्राप्त झालेले आहेत.

ज्याअर्थी, प्रकरणी वृक्षअधिकारी यांनी उपलब्ध कागदपत्रासह अधिनियमातील वृक्षतोडी संदर्भातील तरतुदीनुसार सदर प्रकरण मा. वृक्षप्राधिकरण सभा सूचना क्र.२ अन्वये आयोजित सभा दि२८.१२.२०१५ मध्ये सादरीकरण केले आहे.

ज्याअर्थी, प्रकरणी मा. वृक्षप्राधिकरणामध्ये साधक बाधक चर्चेअंती संदर्भ क्र.२ च्या ठरावान्वये असा निर्णय घेण्यात आलेला आहे की, नियोजित विकास आराखड्यामध्ये अस्तित्वात असलेल्या वृक्षापैकी बांधकामात बाधित होणारे 33 वृक्ष पुर्नरोपण करणे व 86 वृक्ष तोडण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

ज्याअर्थी, प्रकरणी मा. वृक्षप्राधिकरणाने पुढील नमूद अटी व शर्तीस अधिन राहून मान्यता देण्यात आलेली आहे.

१. विकास कामाच्या जागेवर तोडण्यात येणा-या प्रत्येक ०१ वृक्षाच्या प्रित्यर्थ नविन ०५ वृक्षरोपणासह जतन करणे.

२. नविन वृक्षरोपण करण्याच्या वृक्ष रोपांची जात, उंची व वय.

वर नमूद प्रमाणाकानुसार वृक्षांची लागवड करताना स्थानिक मृदू हवामान तसेच स्थानिक वृक्षांच्या जाती विचारात घेऊन पुढील संवर्गातील वृक्षांची निवड करण्यात येत आहे.

अ.क्र.	वृक्ष प्रजाती गट	उंची	वय
१.	सप्तपर्णी, वहावा, कदंब, महोगनी, चाफा, कडुनिंब, ताम्हण, कांचन, बकाम, कैलासपती, प्राजक्ता, बकुळ इ.	किमान ५ फुट	किमान ३ वर्ष
२.	आंबा, जांभुळ, फणस, चिकू, पेरु, चिंच, काजू, नारळ, सुपारी, सिताफळ, बेल, सुरंगी इ.		
३.	वड, पिंपळ, औदुंबर, हरडा, बेहडा, करंज, साग, शिवण, कोशिंब, ऐन, आपटा, रिठा इ.		

(२)

किमान ३' x ३' x ३' आकाराच्या खड्डा खोदून त्या २:१ प्रमाणात लालमाती व शेणखत भरून निर्देशित जातीच्या वृक्षाचे रोपण करणे. ३ वर्षांकरीता रोपांना नियमित पाणी, खत इ. संवर्धन करणे प्रित्यर्थ सुरक्षा अनामत रक्कम रु.५,०००/- (अक्षरी रु. पाच हजार मात्र) प्रति वृक्ष रोप वृक्षप्राधिकरणाकडे जमा करणे. तसेच वृक्षारोपण करण्यास जागा उपलब्ध नसल्यास वृक्षनिधी रक्कम रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) प्रति वृक्षरोप वृक्षप्राधिकरणाकडे जमा करणे.

तद्अनुषंगाने विकास बांधकामात बाधित 33 वृक्ष पुर्नरोपण करणे व ४७ वृक्ष तोडणे असे एकूण ८० वृक्षांच्या प्रित्यर्थ नव्याने ३०० वृक्षाचे रोपे लावून त्यांचे ३ वर्षे संवर्धन करणेकरीता सुरक्षा अनामत रक्कम रु.१५००००० /- (अक्षरी रुपये पंधरा लक्ष मात्र) व एकूण १०० वृक्षांच्या प्रित्यर्थ वृक्षनिधी म्हणून रक्कम रु.१००००० (अक्षरी रुपये दहा लक्ष मात्र) नागरी सुविधा केंद्र, प्रशासकीय भवन, पाचपाखाडी, ठाणे. येथे कार्यालयीन वेळेत भरणा करणे.

टिप : वर नमूद अटी व शर्तींची पूर्तता करणे व त्यानंतर वृक्षांचे पुर्नरोपण व वृक्ष तोडणे याबाबत स्वतंत्र परवानगी पत्र देण्यात येईल.

(संजय मावंडे)
वृक्ष अधिकारी
ठाणे महानगरपालिका, ठाणे.